**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २५ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब असल्याचं पंतप्रधानांच ‘मन की बात’ मधे प्रतिपादन.**
2. **गडचिरोलीच्या काटेझरी गावातील पहिल्यांदाच पोहोचलेल्या बसच्या बाबत पंतप्रधानांचा ‘मन की बात’ मध्ये उल्लेख.**
3. **गृहमंत्री अमित शाह उद्यापासून महाराष्ट्रच्या दौऱ्यावर; नागपूर येथे नॅशनल कॅन्सर इन्स्टिटट्यूट तसेच नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटी येथील कार्यक्रमाला राहणार उपस्थित.**

**आणि**

4. **केंद्र शासनाच्या 'सबका साथ सबका विकास' तसेच सुशासनाच्या प्रतिज्ञेमागे अहिल्याबाई होळकर यांच्या वारशाची प्रेरणा- केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांचे नागपुरात प्रतिपादन.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मन की बात

ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर ती आपला निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब असल्याचं प्रतिपादन पंत प्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. या कारवाईने जगभरातल्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईला नवीन विश्वास आणि उत्साह दिला असल्याचं मोदी यांनी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमात सांगितलं. आज या कार्यक्रमाचा एकशे बावीसावा भाग प्रसारित झाला. ऑपरेशन सिंदूरमुळे देशभरात एकजूट आणि देशाभिमानाची भावना जागृत झाल्याचं सांगून ते म्हणाले की ठिकठिकाणी निघालेल्या तिरंगा यात्रांमधे त्याचं दर्शन घडतं. या मोहिमेनंतर संपूर्ण देशात वोकल फॉर लोकल या संकल्पनेलाही नवी ऊर्जा मिळाली आहे, असं सांगून प्रत्येकानं स्वदेश निर्मित वस्तूंना प्राधान्य देण्याचा निर्धार करावा असं आवाहन त्यांनी केलं. आंतरराष्ट्रीय योग दिनाला आता एका महिन्यापेक्षाही कमी काळ उरला असून, प्रत्येकाने आता योगाभ्यासाशी

जोडून घ्यावं असं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं. यंदाच्या योगदिनासाठी प्रधानमंत्री विशाखापट्टणममधल्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.आयुर्वेदाच्या क्षेत्रात प्रगती होत असल्याचं सांगत त्यांनी जागतिक आरोग्य संघटनेच्या महासंचालकांसोबत झालेल्या सामंजस्य कराराची माहिती दिली. लहान मुलांना लहानपणापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीच्या सवयी लावण्याचं आवाहन करुन पंतप्रधानांनी सीबीएसईच्या शाळांमध्ये मुलांना किती प्रमाणात साखर खावी याबद्दल जागरूक करण्यासाठी शुगर बोर्ड हा उपक्रम राबवला जात असल्याचं उदाहरण दिलं. नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी रचलेल्या विक्रमांची माहिती मोदी यांनी दिली. अशा स्पर्धांमुळे क्रीडा क्षेत्रातलं भारताचं भविष्य उज्ज्वल होऊ शकेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

काटेझरी बस सेवा

देशाच्या नक्षलग्रस्त भागात मूलभूत सोयी-सुविधा पोहोचू लागल्याचं सांगून गडचिरोली जिल्ह्यातल्या काटेझरी गावात पहिल्यांदाच बस सेवा पोहचल्याचं उदाहरण आज पंतप्रधानांनी मन की बात मधून दिलं. दरम्यान, या बससेवेबद्दल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काटेझरी या गावाचा उल्लेख केल्याबद्दल गडचिरोलीच्या एका सामाजिक संघटनेच्या अध्यक्ष गीता हिंगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या

***बसची सुविधा झाल्यामुळे आता तेथील लोकांचे जीवन अधिक सोपे होईल, असे गावकर्यांचे म्हणणे आहे. नक्षलवाद्यांच्या विरुद्धच्या या सामूहिक लढ्यामुळे आता अशा गावात आणि अशा भागात मूलभूत सोयीसुविधा पोहोचू लागल्या आहेत. पोलीस विभागाच्या या स्तुत्य उपक्रमाचं आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी कौतुक केलं आहे आणि आज मन की बात मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील काटेझरी या गावाचा उल्लेख होण आमच्या गडचिरोलीकरांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.***

काटेझरी गावात २३ मार्च २०२५ रोजी पहिल्यांदाच बस पोहोचल्याच्या घटनेचं पंतप्रधानांनी कौतुक केलं, आणि या घटनेनं त्या भागातील विकासाची गाथा अधोरेखित केली.

***आपको एक ऐसे गांव के बारे में बताना चाहता हूं, जहां पहली बार एक बस पहुंची / इस दिन का वहां के लोग वर्षों से इंतजार कर रहे थे / और जब गांव में***

*पहली बार बस पहुंची तो लोगों ने ढ़ोल-नगाड़े बजाकर उसका स्वागत किया। बस को देखकर लोगों की खुशी का ठिकाना नहीं था। गांव में पक्की सड़क थी, लोगों को जरूरत थी, लेकिन पहले कभी यहां बस नहीं चल पाई थी। क्यों, क्योंकि ये गांव माओवादी हिंसा से प्रभावित था। यह जगह है महाराष्ट्र के गढ़चिरौली जिले में, और इस गांव का नाम है, काटेझरी। काटेझरी में आए इस परिवर्तन को आसपास के पूरे क्षेत्र में महसूस किया जा रहा है। माओवाद के खिलाफ सामूहिक लड़ाई से अब ऐसे क्षेत्रों तक भी बुनियादी सुविधाएं पहुंचने लगी है।*

पंतप्रधानांच्या 'मन की बात' मधील या उल्लेखानं गडचिरोली जिल्ह्यातील विकासात्मक कामांना, विशेषतः नक्षलवाद विरोधी मोहिमेला आणि त्यातून सामान्य नागरिकांना मिळत असलेल्या लाभांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची परिषद

भाजपा शासित राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची परिषद आज नवी दिल्लीत होत असून या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी संबोधित करत आहेत. भाजपाशासित सर्व २० राज्यांचे २० मुख्यमंत्री आणि १८ उपमुख्यमंत्री या परिषदेत सहभागी झाले आहेत. या परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित आहेत. सुशासन मुद्द्यांबाबत चर्चा करण्यासाठी या परिषदेचं आयोजन केलं आहे. यावेळी ऑपरेशन सिंदूरच्या यशासाठी भारतीय संरक्षण दल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच अभिनंदन करण्यात आलं. तर केंद्र सरकारचं जात गणना करण्याच्या निर्णयाबद्दल ही अभिनंदन करण्यात आलं. परिषदेपूर्वी उपस्थित मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी मन की बात हा कार्यक्रम ऐकला. या परिषदेला बिहारचे मुख्यमंत्री नितिश कुमार, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण, आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यासह इतर भाजपा शासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उद्यापासून तीन दिवसांसाठी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. उद्या ते नागपूरचा दौरा करणार असून शाह यांच्या हस्ते उद्या सकाळी 11 वाजता जामठा येथील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट येथे ‘स्वस्ति निवास’ भूमिपूजन आणि दुपारी 1 वाजता कामठी तालुक्यातील चिचोली येथे नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिर्व्हसिटीच्या कॅम्पसचे भूमिपूजन होणार आहे. या

कार्यक्रमाच्या संपूर्ण तयारीसाठी शासकीय यंत्रणा आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. दरम्यान, एनएफएसयूचे संस्थापक कुलगुरू पद्मश्री डॉ.जे.एम. व्यास म्हणाले की, महाराष्ट्रात एनएफएसयूच्या नवीन कॅम्पसची स्थापना केल्याने "कुशल फॉरेन्सिक तज्ञांचा" समूह तयार होईल. नागपूर कॅम्पस हे एनएफएसयूचे ११ वे कॅम्पस असेल. एनएफएसयूचे गुजरात, नवी दिल्ली, गोवा, त्रिपुरा, मध्य प्रदेश, कर्नाटक, आसाम, मणिपूर, पुणे आणि परदेशात युगांडामध्ये कॅम्पस आहेत. या कार्यक्रमानंतर २६ मे रोजी नांदेडमध्ये विविध कार्यक्रमांना शाह उपस्थित राहणार आहेत. २७ मे रोजी गृहमंत्री मुंबईत येणार असून त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार आहेत.

अहिल्या देवी होळकर परिषद

केंद्र शासनाच्या 'सबका साथ सबका विकास' तसेच सुशासनाच्या प्रतिज्ञेमागे अहिल्याबाई होळकर यांच्या वारशाची प्रेरणा आहे. राणी अहिल्याबाई होळकर यांनी माळव्याचा राजकारभार चालवतांना तीर्थक्षेत्रांचा विकास या सोबतच आपल्या राज्यात लोकजीवन सुसह्य केले असे प्रतिपादन केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी आज केले. लोकमाता देवी अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आज नागपूरच्या मिहान इथल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आयआयएम नागपूर येथे “तत्वज्ञानी राणी देवी अहिल्याबाई होळकर” या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदचे आयोजन करण्यात आले होते या परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करताना त्या बोलत होत्या. उद्घाटन सत्राला राष्ट्रीय सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का आणि आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मैत्री प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी देवी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना अन्नपूर्णा देवी यांनी सांगितलं की अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या संस्थानाचा राज्यकारभार चालवत असताना काशी पासून सोमनाथ येथील तीर्थक्षेत्रांचा विकास केला.

***(होल्ड बाईट - अन्नपूर्णा देवी 24 सेकंद)***

***काशी से लेकर रामेश्वरम तक, द्वारका से सोमनाथ तक, उनके द्वारा बनाए गए मंदिर, घाट, धर्मशालाएं आज भी हमारे आस्था के केंद्र हैं। महाराष्ट्र की पावन भूमि पर जन्मी देवी अहिल्याबाई होलकर ने काशी को महातीर्थ बना दिया। यह वही परंपरा है।जिसकी आस्था का दीप आज अयोध्या में रामलला के समक्ष झिलमिला रहा है।***

केंद्र शासन सुद्धा अहिल्याबाई होळकर यांनी दाखवलेल्या याच सुशासनाच्या मार्गावर अमृतभारत स्टेशन, स्मार्ट सिटी मिशन तसेच एक्सप्रेसवेच्या निर्माणामुळे लोकजीवन सुसह्य करत आहे. या पायाभूत सुविधे सोबतच सांस्कृतिक वारशाला देखील अधोरेखित करण्याचे काम केंद्र शासन करत आहे, असे केंद्रीय मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी यावेळी स्पष्ट केले. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक समितीच्या संचालिका शांताक्का यांनी देवी अहिल्याबाई होळकर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे पैलू सर्वांसमोर सोदाहरण स्पष्ट केले. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मैत्री यांनी पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे एक उपकेंद्र देखील सुरू करण्यासाठी आयआयएम नागपूरने पुढाकार घेतल्या असल्याचे त्यांनी सांगितलं. या कार्यक्रमा प्रसंगी राकेश गुप्ता लिखित 'डिझाईन थिंकिंग' या पुस्तकाचे अनावरण देखील केंद्रीय मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला आयआयएम नागपूरचे पदाधिकारी त्याचप्रमाणे आयोजक संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते.

आयपीएल टी २०

आयपीएल टी२० क्रिकेटमध्ये, चेन्नई सुपर किंग्जने अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सविरुद्धच्या 5 गड्यांच्या मोबदल्यात 230 धावांचे लक्ष ठेवले असून शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा गुजरात टायटन्सच्या 5 षटकात 3 बाद 30 धावा झाल्या होत्या. आजचा दुसरा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर संध्याकाळी ७:३० वाजता सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होणार आहे.

हवामान

आज संपूर्ण विदर्भात पुढील चार दिवस विजेच्या कडकडाट आणि सोसाट्याच्या वार्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. रायगड, पुणे, लातूर, नांदेड, नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांत विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यांसह पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

******